# कृतिपत्रिका १

## मराठी प्रथम भाषा –०१

**वेळ : ३ तास** **एकूण गुण : ८०**

कृतिपत्रिकेसाठी सूचना :–

(1) सूचनेनुसार आकलनकृती व व्याकरण यांमधील आकृत्या काढाव्यात
(2) आकृत्या पेननेच काढाव्यात
(3) उपयोजित लेखनातील कृतींसाठी(सूचना,निवेदन) आकृतीची आवश्यकता नाही.तसेच या कृती लिहून घेऊ नयेत.
(4) विभाग –५ उपयोजित लेखन प्र.५ (अ) (२) सारांशलेखन या घटकासाठी गदय विभागातील प्र.१ (इ)अपठित उतारा वाचून त्या उताऱ्याचा सारांश लिहावयाचा आहे.
(5) स्वच्छता ,नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष दयावे.

**विभाग –1 : गदय**

१.(अ) उताऱ्याच्या आधारे सुचनेनुसार कृती करा : गुण (७)

(१) योग्य पर्याय निवडा. २

i )डॉ.नीलिमा गुंडी यांच्या मते, मराठी भाषेची श्रीमंती म्हणजे......

अ) मराठी भाषेची लिपी.
आ) मराठी भाषेतील व्याकरण
इ) मराठी ढंगाचे शब्दप्रयोग
ई) मराठीतील अलंकार

ii )युद्धाच्या बातम्यामध्ये पुढीलपैकी वापरला जाणारा वाक्प्रचार....

अ)खस्ता खाणे आ) कंठस्नान घालणे इ) शिट्टी मारणे ई) गप्पा मारणे.

मराठी ढंगाचे शब्दप्रयोग ही आपल्या भाषेची श्रीमंती आहे. मराठीत 'मारणे' हे एक क्रियापद घेतले तर ते किती वेगवेगळ्या प्रकारे वापरले जाते, हे लक्षात घेण्याजोगे आहे. जसे, गप्पा मारणे, उड्या मारणे, थापा मारणे, टिचकी मारणे,शिट्टी मारणे, पाकीट मारणे, जेवणावर ताव मारणे, (पोहताना) हातपाय मारणे, माश्या मारणे इत्यादी. 'मारणे' म्हणजे 'मार देणे' हा अर्थ यात कोठेही आलेला नाही. हीच तर भाषेची गंमत असते.

शब्दप्रयोगाप्रमाणे वाक्प्रचार ही देखील भाषेची खास शैली असते. 'खस्ता खाणे' मध्ये खस्ता हा खाद्यपदार्थ नाही,हे माहीत आहे ना? तसेच 'कंठस्नान घालणे' हा वाक्प्रचार युद्धाविषयीच्या बातम्यांमध्ये असतो. कंठस्नान घालणे म्हणजे गळ्याखालून 'अंघोळ घालणे', असा शब्दश: अर्थ नाही. 'खांद्याला खांदा लावणे' (सहकार्य करणे) आणि 'खांदा देणे'(प्रेताला खांदा देणे) यातला फरकही लक्षात घ्यायला हवा. एकाऐवजी दुसरे क्रियापद वापरले, तर अर्थाचा अनर्थ होईल.अशी अनेक उदाहरणे देता येतील. त्यासाठी शब्दकोश वापरण्याची सवय करायला हवी. 'अक्कलवान' म्हणजे हुशार; पण'अकलेचा कांदा' म्हणजे 'अति शहाणा' हे माहीत नसेल, तर कोण आपले खरे कौतुक करतोय की फिरकी घेतोय, हेच आपल्याला कळणार नाही.

२) परिणाम लिहा : २

- वाक्यात चुकीचे क्रियापद वापरले किंवा वाक्प्रचाराचा अर्थ माहित नसेल तर......

(३)स्वमत: तुम्ही शहाणे आहात यातील शहाणे शब्दाच्या अर्थच्छटा सांगून मराठी भाषेची श्रीमंती स्पष्ट करा. ३

१.(आ) उताऱ्याच्या आधारे सुचनेनुसार कृती करा : गुण (७)

(१) आकृत्या पूर्ण करा. २

i) महर्षी कर्वे यांनी स्थापन केलेली संस्था → [ ]

ii ) स्थितप्रज्ञाची लक्षणे → [ ] → [ ]

महर्षी कर्वे यांनी 'अनाथ बालिकाश्रमा'ची मुहर्तमेढ रोवली. कालांतराने बालिकाश्रमाचे हिंगणा येथे स्थलांतर करून 'हिंगणे स्त्रीशिक्षण संस्था' असे त्यांनी तिचे नामांतर केले. 'पै पै चा निधी' व 'मुरुड निधी' त्यांनी जमवला. त्यांच्यावर चाल करून येणाऱ्या समाजालाही या गोष्टीची पूर्ण कल्पना होती, की यांतील पै पै चा हिशोब कर्व्यांजवळ असणार आहे! कर्व्यांनी जमा केलेल्या निधीची उधळपट्टी तर केवळ असंभव! कर्वे स्वत: मोटार वापरत नसत. मैलोनगणती लांब असलेल्या आश्रमात ते पायी जात. समाजाचे पैसे वापरणे दूरच स्वत:चे पैसेसुद्धा ते समाजासाठी वापरतात, हे मात्र समाजाला माहीत होते. जेवढे खर्च घरात आवश्यक होते तेवढे, आपल्या कमाईतून, ते करत. उर्वरीत सर्व पैसा ते समाजकार्यात वापरत. ते स्वत:च्याच विश्वात वावरतात, अशी कुरबूर, घरच्यांच्या मनांत घर करून राहिली होती. वस्तुत: समाज सुस्वरूप करण्याची महर्षी कर्वेयांची जिद्द होती; पण त्या जिद्दीने कुटुंबाला कुठेही कुरूप केले नाही! नेमकेपणा हा गणिताचा गुणधर्म त्यांना तेथे उपयोगी पडला. ते बोलत नसत. विचार करत. विचार पक्का झाला, की आचरणात आणत. त्यांच्या कार्यातूनच लोकांना अंदाज येई, की त्यांच्या चित्तात काय चालले आहे! हे डावपेच नव्हते; उलटपक्षी, बोलके सुधारक असण्यापेक्षा कर्ते सुधारक असणे, हेच श्रेयस्कर असते! महर्षी कर्वे यांजमध्ये स्थितप्रज्ञाची लक्षणे होती. जो स्वत:च्या सुखदु:खात अविचल राहातो; मात्र, दुसऱ्याच्या दु:खात दु:खी होतो, दुसऱ्याच्या सुखात सुखी होतो, तो खरा स्थितप्रज्ञ! महर्षी कर्वेयांचे लक्ष केवळ समाजसुधारणेत होते. त्यांना कुणावर ऋण ठेवायचे नव्हते तसेच त्यांना कुणाच्या ऋणातही राहायचे नव्हते. कर्व्यांना कुठे जेवावे लागले तर ते पैसे काढून ताटाशेजारी ठेवून उठत. आपल्यावर पैसे कोणाला खर्च करू देत नसत. इतरांना सहसा न साधणारे कार्य करायचे होते महर्षी कर्वे यांना!

(२) आकृतिबंध पूर्ण करा : २

i ) [ ] ← महर्षी कर्वे यांनी जमवलेला निधी → [ ]

ii ) महर्षी कर्वे यांची जिद्द
↓
[ ]

(३) स्वमत : 'कर्ते सुधारक कर्वे ' या पाठातून महर्षी कर्वे यांचे तुम्हाला जाणवलेले गुण स्पष्ट करा. ३

## अपठित गद्य

१.(अ) उताऱ्याच्या आधारे सुचनेनुसार कृती करा : गुण (४ )

(१) उत्तर लिहा : २

i )शिक्षकांचे पालकांचे मूळ कार्य हे  आहे ------

ii )पुस्तकाना जवळ केल्यास  वाचकांचा प्रवास येथपर्यन्त होऊ शकतो -------

> वाङ्मयीन अभिरुची निर्माण करण्यात खरंच खूप गंमत आहे. दरवेळी यशच येईल असं नाही, पण धडपडणंच किती सुंदर आहे !
>
> पुस्तकांना आपण जवळ घेता घेता,पुस्तकही आपल्याला जवळ घेतात. वाचकाचा प्रवास हळूहळू लेखनापर्यंतही होऊ लागतो. शब्दांच्या छटांची तरलता जगण्याचे उत्सव फुलू लागते.
>
> नव्या पिढीला माणूसपणाच्या तरलतम सुंदरतेकडे नेणं हे तर पालक व शिक्षकांचे मूळ कार्य !
>
> या आनंदमय कामात ग्रंथ आपले प्रेरक ठरतात. म्हणूनच ग्रंथपाल हे ग्रंथसंस्कृतीचे लोकपाल  असतात

(२ )  पुढील आकृतिबंध पूर्ण करा. : २

i) वाचकाचा प्रवास ______


ii)शब्दांच्या तरलेतेचा प्रवास ______

## विभाग –2  : पद्य

२ .(अ) पुढील कवितेच्या आधारे सुचनेनुसार कृती करा : गुण (८ )

(१) आकृतिबंध पूर्ण करा : २

i)



सुसंगती सदा घडो; सुजनवाक्य कानी पडो;
कलकं मतिचा झडो; विषय सर्वथा नावडो;
सदंघ्रिकमळी दडो; मुरडिता हटानें अडो;
वियोग घडता रडो; मन भवच्चरित्री जडो ।।

न निश्चय कधी ढळो; कुजनविघ्नबाधा टळो;
न चित्त भजनी चळो; मती सदुक्तमार्गी वळो; ।
स्वत्व हृद्या कळो; दुरभिमान सारा गळो;
पुन्हा न मन हें मळो; दुरित आत्मबोधें जळो ।।

मुखी हरि ! वसो तुझी कुशलधामनामावली,
क्षणात पुरवील जी सकलकामना मावली; ।
कृपा करिशी तू जगत्रयनिवास दासावरी,
तशी प्रगट हे निजाश्रितजनां सदा सांवरी ।।

(२) खालील वाक्यातील अचूक विधाने ओळखा : २

१) नेहमी दुर्जनाच्या सहवासात रहावे.
२) सज्जनांचे विचार नेहमी ऐकावे.
३) खोटा अभिमान बाळगावा.
४) चांगल्या मार्गाचाच नेहमी विचार करावा.

(३ ) पुढील काव्यपंक्तीचा सरळ अर्थ लिहा : २

सदंघ्रिकमळी दडो; मुरडिता हटानें अडो;
वियोग घडता रडो; मन भवच्चरित्री जडो ।।

(४ ) काव्यसौन्दर्य :

पूढील काव्य पंक्तींतून व्यक्त झालेला तुमच्या शब्दांत लिहा : २

स्वत्व हृद्या कळो; दुरभिमान सारा गळो;
पुन्हा न मन हें मळो; दुरित आत्मबोधें जळो ।।

२.(आ) १ )पुढीलपैकी कोणत्याही एका कवितेवर त्याखाली दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे कृती सोडवा : गुण (८)

i ) आश्वासक चित्र ii ) तू झालास मूक समाजाचा नायक

कृती – i) कवितेचे कवी/कवयित्री :------------ १

ii)कवितेतून मिळणार संदेश :------------- १

iii) कविता आवडण्याची/न आवडण्याची कारण. २

२.(इ ) १ )पुढील काव्यपंक्तीचे रसग्रहण करा : गुण (४ )

तुज पंख दिले देवाने
कर विहार सामर्थ्याने
दरी डोंगर हिरवी राने
जा ओलांडुनि या सरिता सागरा

## विभाग –३ : स्थूलवाचन

प्र. ३ खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा. : गुण (६)

१) 'गिरिजा कीर यांना बालकांच्या विश्वातले दैनंदिन जिव्हाळ्याचे प्रश्न महत्त्वाचे वाटतात.' हे विधान त्यांच्या बालनाट्याचे उदाहरण देऊन स्पष्ट करा. २

२) पतिनिधनानंतर लेफ्टनंट स्वाती महाडिक यांनी घेतलेला निर्णय आणि त्याचे वेगळेपण तुमच्या शब्दांत सांगा. २

३) व्युत्पत्ती कोशाबाबत पुढील मुद्द्यानुसार माहिती लिहा. २

i ) निर्मितीची जबाबदारी

ii ) व्युत्पत्ती कोशाचे कार्य

## विभाग –४ : भाषाभ्यास

प्र. ४. अ )व्याकरण घटकावर आधारित कृती : गुण (८)

१) समास : २

योग्य जोड्या लावा :

| सामासिक शब्द | समासाचे नाव |
|---|---|
| i ) त्रिभुवन<br>ii ) पालापाचोळा | १) कर्मधारय<br>२) द्विगू समास<br>३) समाहार द्वंद्व |

२ ) शब्दसिद्धी : २

खालील तक्ता पूर्ण करा:

नागरिक, भरदिवसा,मागोमाग,आनंदित

| उपसर्गघटित | प्रत्ययघटित | अभ्यस्त |
|---|---|---|
| | | |

३ ) वाक्प्रचार :

खालीलपैकी कोणत्याही दोन वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा: ४

१)कानोसा घेणे

२) तोंड सुख घेणे

३) इनाम मिळणे

४) खूणगाठ बांधणे

प्र. ४. आ )भाषिक घटकावर आधारित कृती : गुण (८)

(१)शब्दसंपत्ती

१)खालील शब्दानां समानार्थी शब्द लिहा : १

i) वृक्ष [ ]

ii) आकाश [ ]

२)खालील शब्दांचे वचन बदला : १

i) रस्ते [ ]

ii) विहीर [ ]

३)खालील शब्दसमूहासाठी एक शब्द लिहा : १

i) संपादन करणारा– [ ]

ii )केलेले उपकार जाणणारा– [ ]

४)खालील शब्दातील अक्षरापासून दोन अर्थपूर्ण शब्द तयार करा : १

सकलकामना ( सकल व कामना हे शब्द वगळून )

(२)लेखननियमांनुसार लेखन :

अचूक शब्द ओळखा (कोणतेही चार शब्द सोडविणे ): २

i) शीर्षक /शिरशक /शिरषक /शिर्षक
ii) पुरवार्ध/पूर्वार्ध /पुरवार्ध /पुरवारध
iii) आशिर्वाद/आरशीवाद /आशीर्वाद/आर्शीवाद
iv) हार्दिक /हारदीक/हार्दीक/हारदिक
v) अंतरमुख/अंतर्मुख/आंतर्मुख/अंतमूर्ख
vi) किरडानगण /क्रिडांगण /क्रीडांगण /क्रीडांगन

(3)विरामचिन्हे : १

खालील विरामचिन्हे ओळखून त्यांची नावे लिहा :

i ) “ ” [ ]

ii) ; [ ]

(3)विरामचिन्हे : १

खालील शब्दांना प्रचलित मराठी भाषेतील शब्द लिहा :

i ) Absence – [ ]

ii ) secretary – [ ]

## विभाग –५ : उपयोजित लेखन

प्र. ५ .( अ )खालील कृती सोडवा : गुण (६ )

१ )पत्रलेखन :

पुढील निवेदन वाचा व त्याखालील कोणतीही एक कृती सोडवा.

त्वरा करा ! त्वरा करा !

**वाचाल तर वाचाल**

**जनसेवा पुस्तकालय,**

**गांधी रोड, नागपूर**

☺दुकानाच्या वर्धापन दिनानिमित्त
आकर्षक सवलत ☺

विद्यार्थ्यांकरिता २० %सवलत

वाचकांकरीता १००० /–रु. किमतीच्या पुस्तकावर विशेष भेट

दिनांक :१ नोव्हेंबर ते १५ नोव्हेंबर पर्यन्त

वेळ : सकाळी १० ते सायंकाळी ८ पर्यन्त

रसिक वाचक या नात्याने पुस्तकालयाच्या व्यवस्थापकांना स्वत:साठी पुस्तकांची मागणी करणारे पत्र लिहा.

किंवा

ग्रंथालय प्रतिनिधि या नात्याने संबंधित व्यक्तीला शालेय ग्रंथालयासाठी अधिक सवलतीच्या दरात देण्यासाठी विनंती करणारे पत्र लिहा.

किंवा

(२ ) **सारांशलेखन**

विभाग– १ गद्य (इ) [प्र.क्र . १ (इ )] मधील अपठित गद्य उताऱ्याचा १/३ एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा.

( आ )खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा : गुण (१० )

**१) जाहिरात लेखन :**

पुढील जाहिरातीचे अधिक आकर्षक पद्धतीने पुनर्लेखन करा.

**साद देती हिमशिखरे !**

**युवकांनो,तुमच्यातील तरुणाईला आव्हान !!**

प्रतिवर्षाप्रमाणे साहस युवक मंडळाने मे महिन्याच्या सुट्टीत

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी गिर्यारोहण मोहीम आयोजित केली आहे.

**अधिक माहितीसाठी १५ एप्रिल २०२१ संपर्क साधा.**

**साहस युवक मंडळ**

१० आशा,महात्मा गांधी मार्ग,विलेपार्ले (पू.),मुंबई –402057 दूरध्वनी:022 (2679792)

**२ बातमीलेखन :**

खालील विषयावर बातमीलेखन करा:

२७ फेब्रुवारी २०२१ रोजी आदर्श विद्यामंदिर,पुणेतर्फे 'मराठी भाषादिन' उत्साहात संपन्न .

**३ कथालेखन :**


( पुढील कथेचा उत्तरार्ध लिहा व समर्पक शीर्षक द्या )

रामेश्वरमला जीवन नावाचा माणूस राहत होता. तो अत्यंत आळशी होता. त्याच्या डोक्यात सारखे धनाचे विचार होते. मनात सतत परमेश्वराचे मनन–चिंतन होते . जीवनच्या मनात धनाचे विचार हा रोजचा कार्यक्रम होऊन बसला होता. धनाच्या लोभाने तो काहीही करायला तयार होतो. आणि एकदिवस -------------------- --
------------------------------------------------------------
------------------------------------------------------------

प्र. ५ .(इ )खालील लेखनप्रकारापैकी कोणतीही कृती सोडवा : गुण (८ )


### १ वैचारिक लेखन

खालील दिलेल्या चौकटीतील घटकाच्या आधारे तुमचे विचार लिहा.




### २ आत्मकथन

दिलेल्या मुद्दयांच्या आधारे चौकटीतील घटकाचे आत्मकथन लिहा :




### ३ प्रसंगलेखन

‘प्रयोग’ विज्ञान मंडळ ,
भोपाळ आयोजित
**‘आकाशदर्शन सोहळा ’**
शनिवार १३ जानेवारी संध्या ७ :३०. ते रविवार १४ जानेवारी पहाटे ४ :३० पर्यन्त
ग्रहाबद्दलची माहिती सांगणारी व्हिडिओफिल्म
शाळेत जेवणाची सोय प्रवेश शुल्क ५००/–रु. प्रत्येकी

वरील सोहळ्यास तुम्ही उपस्थित होता अशी कल्पना करून प्रसंगलेखन करा.